GR 20040426163046001-0500

**सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्यास इच्छुक संस्थांकडून विलंब शुल्कासह प्रस्ताव स्वीकारण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र.एचएससी १७०३/(५१९/०३)/उमाशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक : १५ जुलै २००४.

वाचावे :- १) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग क्र.एचएससी १७०३/(५१९/०३)/उमाशि-१, दि.२३ ऑक्टोबर, २००३.
२) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग क्र.एचएससी १७०३/(५१९/०३)/उमाशि-१, दि.११ डिसेंबर २००३.

**: परिपत्रक :**

सन २००४ -०५ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन प्राथमिक /माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळा **कायम विना अनुदान तत्वावर** सुरु करण्यास इच्छुक असलेल्या शैक्षणिक संस्थांकडून विहित चलनासह व विहित नमुन्यांत दिनांक ३० नोव्हेंबर, २००३ पर्यंत शासनाच्या उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये रितसर प्रस्ताव मागविण्यांत आले होते. तथापि विहित मुदतीत काही संस्थांनी अर्ज दाखल न केल्यामुळे सदर मुदत दि. ३१ डिसेंबर २००३ अखेरपर्यंत वाढवून देण्यात आली होती. सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांचा विचार करुन ज्या प्रस्तावांना जिल्हा समिती किंवा राज्यसमिती यापैकी एका समितीने अनुकूल शिफारस दिली होती अशा सर्व प्रस्तावांवर निर्णय घेण्यात आला आहे. तथापि काही संस्था नवीन शाळा परवानगीसाठी विहित मुदतीत अर्ज सादर करु शकल्या नाहीत तसेच त्रुटींमुळे /तांत्रिक अडचणींमुळे काही प्रस्तावांना त्या ठिकाणी शाळेची गरज असतानाही मान्यता प्राप्त होऊ शकली नाही अशा संस्थांच्या संदर्भात बऱ्याच संस्थाचालकांकडून उशिरा चलन व विलंब शुल्क आकारुन प्रस्ताव सादर करण्याबाबत शासनाकडे विनंती अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यांच्या विनंतीचा विचार करुन सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात नवीन प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यासाठी इच्छुक असलेल्या शैक्षणिक संस्थांकडून विलंब चलन शुल्कासह व विहित नमुन्यांत **दि.३० सप्टेंबर २००४** अखेरपर्यंत संबंधित शिक्षणाधिकारी ( प्राथमिक / माध्यमिक / शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई ) यांच्याकडे सादर करावेत.

२. अखेर ३० ऑक्टोबर २००६ या कालावधीत शैक्षणिक संस्थांकडून प्राथमिक शाळेसाठी अर्ज दाखल करताना मूळ चलन रु. ५००/- व विलंब शुल्क म्हणून रु. ६,०००/- अशा प्रकारे रु. ६,५००/- आकारण्यात यावे. त्याचप्रमाणे माध्यमिक व उच्च माध्यमिकसाठी मूळ चलन रु. ५,०००/- व विलंब शुल्क रु.१०,०००/- अशा प्रकारे एकूण १५,०००/- आकारण्यात यावेत.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक (शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई ) यांच्याकडे <u>दि.३० सप्टेंबर २००६</u> अखेरपर्यंत प्राप्त झालेले परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा समितीसमोर ठेवून त्यांच्या शिफारशींसह शिक्षण संचालक (प्राथमिक) व शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ) ,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडे <u>दि.१५ ऑक्टोबर २००६</u> पर्यंत पाठवावेत. शिक्षण संचालक (प्राथमिक) व शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ) , महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी सर्व शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक यांच्याकडून जिल्हा समितीच्या शिफारशींसह प्राप्त झालेले प्रस्ताव राज्य समितीसमोर छाननीसाठी ठेवून ते प्रस्ताव <u>दि. ३१ ऑक्टोबर २००६</u> पर्यंत शासनास सादर करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज.मो. फाटक)
सचिव, शालेय शिक्षण.

प्रति,
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.) महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,
शिक्षण निरीक्षक (दक्षिण/पश्चिम/उत्तर), बृहन्मुंबई.
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,
कार्यासन प्राशि-३/ माशि-४/ उमाशि-१, शालेय शिक्षण विभाग.
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय ( प्रसिध्दि ), मंत्रालय, मुंबई यांच्याकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.
निवड नस्ती.